अकोला महानगरपालिकेस संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) / राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी मधून निधी मंजूर करण्याबाबत. (रु.१३२.११ कोटी)

महाराष्ट्र शासन
नगरविकास विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३८१/नवि-३३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ नोव्हेंबरे, २०२६

संदर्भ :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि. २७ मार्च, २०२३.
२. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. विआकाअ/प्रा.उ./न.पा.प्र./कार्या-१०/पाणी टंचाई/ कावि-६४/२०२६, दि. १४ ऑक्टोबर, २०२६.
३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, अमरावती यांची तांत्रिक मंजूरी क्र. मु.अ./मजीप्रा/अम/रेचिशा/तांमं/१५६०/२०२६, दि. १२ ऑक्टोबर, २०२६.
४. शहर अभियंता, अकोला महानगरपालिका यांची तांत्रिक मंजूरी क्रमांक.T.S.No.६९/२०२६-२७, दि. १२ ऑक्टोबर, २०२६

प्रस्तावना :-

राज्यात उभ्दवणाऱ्या विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ४८ (२) अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) ची स्थापना करण्यात आली आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून केवळ चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, बर्फखंड कोसळणे (हिमवर्षाव), ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट व कडाक्याची थंडी या १२ नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत अनुज्ञेय असून याबाबतचे निकष संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहेत.

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये अकोला शहराच्या संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी रु. १३२.११ कोटी निधीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची शासनास विनंती केली असून त्या अनुषंगाने सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) / राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून अकोला शहराच्या संभाव्य पाणीटंचाईच्या निवारणासाठी मोरना धरण ते जलशुध्दीकरण केंद्र (महान) पर्यंत आवश्यक साहित्यासह पाईप लाईन टाकणे या कामाकरिता रु. ८७.६७ कोटी व टँकरव्दारे पाणीपुरवठा व वितरण व्यवस्थेसाठी रु.४४.४४ कोटी अशा एकूण रु. १३२.११ कोटी किंमतीच्या प्रकल्पास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) / राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून अकोला महानगरपालिकेच्या रु.८७.६७ कोटी प्रकल्प किंमतीच्या मोरना धरण ते जलशुध्दीकरण केंद्र (महान) पर्यंत आवश्यक साहित्यासह पाईप लाईन टाकणे या कामाकरिता मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांनी दिनांक १२ ऑक्टोवर २०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या तांत्रिक मान्यतेमधील अटी व शर्तीच्या अधीन राहून तसेच, अकोला महानगरपालिकेच्या रु. ४४.४४ कोटी प्रकल्प किंमतीच्या टँकरव्दारे पाणीपुरवठा व वितरण व्यवस्था या कामाकरिता शहर अभियंता, अकोला महानगरपालिका यांनी दि. १२

ऑक्टोबर, २०२६ रोजी तांत्रिक मंजूरी क्र.T.S.No.६९/२०२६-२७ अन्वये दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अनुसरुन या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा अकोला महानगरपालिका राहील.

४. संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

५. केंद्र व राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे संबंधित कार्यान्वयन यंत्रणेवर बंधनकारक राहील. सदर शासन निर्णयातील एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रु. १०.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करुन (package) ई - निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Spliting) करुन कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यास येईल व याची जबाबदारी अकोला महानगरपालिका यांची राहील.

६. सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात अकोला महानगरपालिकेस शासनास सादर करणे बंधनकारक आहे.

७. सदर प्रकल्पासाठी शासनामार्फत वितरीत केलेल्या निधीचे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये निधी ठेवणे अनिवार्य राहील. सदर प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी त्याच प्रकल्पासाठी वापरणे बंधनकारक असून त्याचा वापर इतर प्रयोजनार्थ केल्यास सदर बाब ही गंभीर वित्तिय अनियमितता समजण्यात येईल.

८. अकोला महानगरपालिकेच्या सदर प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अकोला महानगरपालिकेची राहील. राज्य शासनामार्फत त्याकरिता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही.

९. अकोला महानगरपालिकेस यापूर्वी इतर कोणत्याही योजनेंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या प्रकल्पातील उपांगे व या प्रकल्पातील उपांगे यामध्ये व्दिरुक्ती (Duplication) होत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबादरी अकोला महानगरपालिकेची राहील.

१०. टँकरव्दारे पाणीपुरवठा करतांना विहित प्रक्रिया, निकष व प्रमाणित कार्यपध्दतीचे पालन करुन नियमोचित कार्यवाहीचे पालन होईल याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, अकोला महानगरपालिका यांची राहील.

११. सदर निधी मागणी क्र. सी-६, १०२, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५ ००९३) (अनिवार्य) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या वर्षाच्या मंजूर आर्थिक तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१२. सदर प्रकल्पाचा निधी वितरणाचा शासन आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०६१५३७४३६३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.11.06 15:38:25 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुध्दे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
१३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग.
१५. जिल्हाधिकारी, अकोला.
१६. आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला.
१७. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, अमरावती.
१८. जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला.
१९. निवड नस्ती, नवि-३३.